# सैन्य सेवेतून सेवामुक्त झाल्यानंतर त्याची पुनर्नियुक्ती नागरी सेवेत झाल्यास वेतननिश्चिती

- म.ना.से. (नि.वे) नियम १९८२ मधील नियम क्र. १५७ व १६२ व शासन निर्णय वित्त विभाग दि.११.०७.२०१२.

कर्मचारी केंद्र किंवा राज्य शासनाच्या सेवेतून सेवामुक्त झाल्यानंतर त्याची पुनर्नियुक्ती नागरी सेवेत झाल्यास वेतन निश्चिती करावी लागते. पुनर्नियुक्ती खालील दोन प्रकारची आहे:-

- नागरी विभागातील निवृत्तीवेतनधारकांची पुनर्नियुक्ती - म.ना.से.(नि.वे) १९८२ मधील नियम नियम क्र. १५७
- माजी सैनिकांची नागरी विभागातील पुनर्नियुक्ती - म.ना.से. (नि.वे) १९८२ मधील नियम नियम क्र. १६२ व शासन निर्णय वित्त विभाग दि.११.०७.२०१२.

**माजी सैनिकांची पुनर्नियुक्ती.** माजी सैनिक अधिकारी/जवान यांची नागरी विभागात पुनर्नियुक्ती झाल्यानंतर वेतननिश्चती करण्यासाठी त्यांची खालील दोन गटात विभागणी करण्यात आली आहे :-

**राजादिष्ट अधिकारी.**

पुनर्नियुक्तीनंतरचे वेतन + संपूर्ण सैनिकी निवृत्तीवेतन (सेवानिवृत्ती उपदानाचे_ निवृत्तीवेतन सममुल्य किंवा निवृत्तीवेतनाऐवजीच्या उपदानाचे निवृत्तीवेतन सममुल्य असल्यास ते धरुन) यांची रक्कम, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनापेक्षा (म्हणजेच कोणत्याही भत्त्याव्यतिरिक्त मुळ वेतनापेक्षा) अधीक असता कामा नये.

आणखी असे की, अशा प्रकारे निश्चित केलेले वेतन वेतनमानातील किमान वेतनापेक्षा कमी असेल तर ते किमान वेतनावर निश्चित करता येईल. वयाची ५५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सेवानिवृत्त होणाऱ्या राजादिष्ट अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित सेवानिवृत्तीवेतनाची मर्यादा ०१.०१.२००६ पासून रु. ४०००/- करण्यात आलेली आहे. राजादिष्ट अधिकाऱ्यांपेक्षा कमी दर्जाच्या व्यक्तिच्या बाबतीत संपूर्ण निवृत्ती वेतन दुर्लक्षित केले जाईल.

**कनिष्ठ राजादिष्ट अधिकारी व त्यांच्या खालील अधिकारी.**

पूर्नियुक्तीनंतरचे वेतन, निवृत्तीवेतनविषयक लाभ विचारात न घेता अखेरच्या मिळालेल्या वेतना इतक्या (म्हणजेच कोण्त्याही प्रकारच्या भत्याव्यतिरिक्त मूळ वेतना इतक्या) समयश्रेणीतील वेतनावर निश्चित करण्यात येईल.

सैन्य सेवेतील अंतीम मूळ वेतन+क्लास पे+जी.एस. पे + ग्रेड पे या बाबी मुळ वेतनाचा भाग आहे. मात्र मिलिट्री सर्व्हिस पे वेतनिश्चितीकरिता मूळ वेतनात समाविष्ट केला जात नाही. याबाबत दि. ११.०७.२०१२ च्या शासननिर्णयाचे अवलोकन करावे.

## उदाहरण १

**राजादिष्ठ अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सैन्य सेवेतील अंतीम वेतन | : | मूळ वेतन रु. ४५९७०+एमएस पे रु. ६०००+ग्रेड पे रु. ८००० = **रु. ५९९७०** |
| २. | सैन्य सेवेतील निवृत्ती वेतन | : | **रु. २९९८५** |
| ३. | सैन्य सेवा निवृत्ती दिनांक | : | **३१.०७.२०१०** |
| ४. | नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना | : | **पे बँड २, रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु ५०००/-** |
| ५. | नियुक्ती दिनांक | : | **१५.०६.२०११** |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) आणि महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पुनिवे-१००९/प्र.क्र.७८/सेवा-४ दि. ११.०७.२०१२ मधील तरतुदीनुसार त्यांची खालील प्रमाणे वेतननिश्चिती होईल :-

| अ.क्र | बाब | वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सैन्यातील अंतिम वेतन<br>(मूळ वेतन रु. ४५९७०+ग्रेड पे रु. ८००० = **रु. ५३९७०/-**)<br>*(दि. ११.७.२०१२ च्या अ.क्र. ८ नुसार एमएस पे विचारात घेतला नाही)* | ५३९७०/- |
| २. | सैन्य सेवेचे निवृत्तीवेतन (पी.पी.ओ नुसार)<br>(मूळ वेतन रु. ४५९७०+ग्रेड पे रु. ८०००= **रु. ५३९७०/-**) च्या ५०% = **रु. २६९८५/-)**<br>*(दि. ११.७.२०१२ च्या अ.क्र. ८ नुसार एमएस पे विचारात घेतला नाही)* | २६९८५/- |
| ३. | नागरी सेवेत नियुक्तीचा दिनांक | १५.०६.२०११ |
| ४. | **__________या पदाची वेतन संरचना - पे बँड २, रु.९३००-३४८००, ग्रेड पे रु ५०००/-** | |
| ५ | **नियुक्तीच्या दिनांकास (१५.०६.२०११ रोजी) वेतननिश्चिती** | |
| | (अ) वेतन निश्चितीसाठी विचारात घ्यावयाचे निवृत्तीवेतन<br>(रु. २६९८५ - रु. ४००० दुर्लक्षित) = रु. २२९८५/- | रु. २२९८५/- |
| | (ब) सैन्य सेवेतील अंतीम वेतन रु. ५३९७०-२२९८५= ३०९८५/- | **रु. २५९९०/-** |
| | (क) रु.३०९८५-५०००(नागरी सेवेतील ग्रेड वेतन) =२५९८५ (दहाच्या पटीत) = **रु. २५९९०/-** | |
| ६. | पदास लागू असलेले ग्रेड वेतन | **रु. ५०००/-** |
| **टीप.** म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (ए) नुसार पुर्ननियुक्तीचे वेतन + निवृत्ती वेतन यांची बेरीज अंतिम वेतना पेक्षा अधिक नाही. | | |
| ७. | पुढील वेतनवाढीचा दिनांक | **०१.०७.२०१२** |

पुढील वेतन वाढीचा दिनांक सुधारित वेतन [म.ना.से (सु.वे.) नियम, २००९ मधील नियम ९ आणि १०] आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :-

| बाब क्र. | वेतनवाढीचा दिनांक | **वेतनवाढीनंतरचे वेतन Pay after Increment** | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणीमधील वेतन | ग्रेड वेतन |
| i | ii | iii | iv |
| १. | **०१ जुलै २०१२** | **२५९९०+ ९३० = २६९२०**<br>[अ.क्र. ५ + अ.क्र. ६ च्या ३%] | **५०००/-**<br>[वरील अ.क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे] |
| २. | **०१ जुलै २०१३** | **२६९२०+ ९६० = २७८८०**<br>[बाब क्र. १ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. १ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **५०००/-** |

**उदाहरण २**

## लघुसेवा राजादिष्ठ अधिकारी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सैन्य दलात लघुसेवा राजादिष्ठ अधिकारी सेवा | : | **०७ वर्षे, ११ महिने आणि १५ दिवस.** |
| २. | नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना | : | पीबी-२ रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु ५०००/- |
| ३. | नियुक्ती दिनांक | : | १८.०३.२०११ |

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-आरटीए-१०८६/३१७०/प्र.क्र. २५९/९१/२८ दिनांक ०२.०६.१९९२ नुसार नागरी सेवेत रुजू झालेल्या लघुसेवा राजादिष्ठ अधिकाऱ्यांची वेतन निश्चीत करण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार सैन्य सेवेतील प्रत्येक पूर्ण वर्षाला एक वेतनवाढ देवून वेतननिश्चीत करण्यात येते.

**वरील प्रकरणी खालीलप्रमाणे वेतननिश्चिती होईल.**

| **अ. क्र.** | | |
|---|---|---|
| १. | नागरी सेवेतील __________ या पदाची वेतनसंरचना : | पीबी २, रु. ९३००-३४८०० ग्रेड पे रु ५०००/- |
| | दि. २२.०४.२००९ च्या अधिसुचने मधील नियम ८ च्या जोडपत्र क्रमांक ३ नुसार पदाचे प्रारंभिक वेतन व ग्रेड पे) | वेतनबॅन्डमधील वेतन - रु. १३७१०/-<br>ग्रेड वेतन - रु. ५०००/- |
| २. | सैन्य सेवेतील प्रत्येक पुर्ण वर्षाला एक वेतनवाढ या प्रमाणे ७ वर्षाच्या सेवेसाठी ७ (सात) **काल्पनीक वेतनवाढी** खालील प्रमाणे आहेत :-<br>१. १३७१०० + ५००० = १८७१० x ३ % = **५७०/-**<br>२. १४२८० + ५००० = १९२८० x ३% = **५८०/-**<br>३. १४८६० + ५००० = १९८६० x ३% = **६००/-**<br>**४.** १५४६० + ५००० = २०४६० x ३% = **६२०/-**<br>५. १६०८० + ५००० = २१०८० x ३% = **६४०/-**<br>६. १६७२० + ५००० = २१७२० x ३% = **६६०/-**<br>७. १७३८० + ५००० = २२३८० x ३% = **६८०/-**<br>**एकूण ४३५०/-** | रु. **४३५०/-** |
| ३. | **एकूण** (अ. क्र. १ + २) (१३७१० + ४३५० = १८,०६०) | रु. **१८,०६०**/-, ग्रेड पे **५०००**/- |
| **४.** | **दिनांक १८.०३.२०११ रोजी निश्चीत केलेले वेतन** | रु. **१८,०६०**/-, ग्रेड पे **५०००**/- |
| **५.** | **पुढील वेतनवाढीचा दिनांक** | ०१ जुलै २०१२ |
| ६. | दिनांक ०१.०७.२०१२ रोजी वार्षिक वेतनवाढ दिल्यानंतरचे वेतन (१८०६०+ ५००० = २३०६० x ३% = ७००)<br>**१८,०६० + ७०० = १८,७६०/-** | **रु. १८,७६०/-, ग्रेड पे ५०००/-** |
| ७ | **पुढील वेतनवाढीचा दिनांक** | ०१ जुलै २०१३ |

उपरोक्त प्रमाणे वेतननिश्चिती करताना काल्पनिक वेतनवाढी दिल्यानंतरचे वेतन सैन्यातून निवृत्त होताना असलेल्या मूळ वेतनापेक्षा हाता काम नये.

## <u>उदाहरण ३</u>

### <u>कनिष्ठ राजादिष्ठ अधिकारी</u>

(०१.०१.२००६ नंतर सैन्य सेवेतून निवृत्त झालेले व ०१.०१.२००६ नंतर नागरी सेवेत रुजू झालेले)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सैन्य सेवा निवृत्ती दिनांक | : | **०१ मार्च २००६** |
| २. | सैन्य सेवेतील अंतीम वेतन | : | मूळ वेतन रु.८९३०+ग्रेड पे रु. २८००+क्लास पे रु ३००+ जीएस पे रु ९६ = **रु. १२१२६/-** |
| ३. | नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना | : | पे बँड १, रु. ५२००-२०२००, ग्रेड पे १९०० |
| ४. | नियुक्ती दिनांक | : | **१८ जानेवारी २०१०** |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (बी) आणि महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पुनिवे-१००९/प्र.क्र.७८/सेवा-४ दि. ११.०७.२०१२ मधील तरतुदीनुसार त्यांची खालील प्रमाणे वेतननिश्चिती होईल :-

| अ.क्र | बाब | वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सैन्यातील अंतिम वेतन (मूळ वेतन रु.८९३०+ग्रेड पे रु. २८००+क्लास पे रु ३००+ जीएस पे रु ९६ = रु. १२१२६/-) | १२१२६ |
| २. | नागरी सेवेत नियुक्तीचा दिनांक | १८ जानेवारी २०१०. |
| ३. | __________ पदाची वेतन संरचना | पे बँड १, रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ४. | नियुक्तीच्या दिनांकास (१८.०१.२०१० रोजी) वेतननिश्चिती रु. १२१२६-१९०० (नागरी सेवेतील ग्रेड वेतन) =१०२२६/- दहाच्या पटीत रु. १०२३०/- (शासन निर्णय दि. ११.०७.२०१२ च्या परिच्छेद क्र. ३(१) मधील तरतुदीनुसार) | **रु. १०२३०** |
| ५. | पदास लागू असलेले ग्रेड वेतन | **रु. १९००** |
| ६. | पुढील वेतनवाढीचा दिनांक | ०१.०७.२०११ |

पुढील वेतन वाढीचा दिनांक सुधारित वेतन [म.ना.से (सु.वे.) नियम, २००९ मधील नियम ९ आणि १०] आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :-

| बाब क्र. | वेतनवाढीचा दिनांक | **वेतनवाढीनंतरचे वेतन Pay after Increment** | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणीमधील वेतन | ग्रेड वेतन |
| i | ii | iii | iv |
| १. | **०१ जुलै २०११** | **१०२३०+ ३७० = १०६००** [अ.क्र. ४ + अ.क्र. ५ च्या ३%] | **१९००/-** [वरील अ.क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे] |
| २. | **०१ जुलै २०१२** | **१०६००+ ३८० = १०९८०** [बाब क्र. १ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. १ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१९००/-** |

## उदाहरण ४

**कनिष्ठ राजादिष्ठ अधिकारी**

(०१.०१.२००६ पूर्वी सैन्य सेवेतून निवृत्त झालेले व ०१.०१.२००६ नंतर नागरी सेवेत रुजू झालेले)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सैन्य सेवा निवृत्ती दिनांक | : | **०१ जुलै २००४** |
| २. | सैन्य सेवेतील अंतीम वेतन | : | (मूळ वेतन रु. ४८००+क्लास पे रु १५०+ जीएस पे रु ९६ = रु ५०४६/-) |
| ३. | नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना | : | पे बँड १, रु. ५२००-२०२००, ग्रेड पे १९०० |
| ४. | नियुक्ती दिनांक | : | **०२ जानेवारी २००८** |

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १६२ (बी) आणि महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पुनिवे-१००९/प्र.क्र.७८/सेवा-४ दि. ११.०७.२०१२ मधील तरतुदीनुसार त्यांची खालील प्रमाणे वेतननिश्चिती होईल :-

| अ.क्र | बाब | वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सैन्यातील अंतिम वेतन (मूळ वेतन रु. ४८००+क्लास पे रु १५०+ जीएस पे रु ९६ = रु ५०४६/-) | ५०४६ |
| २. | नागरी सेवेत नियुक्तीचा दिनांक | ०२ जानेवारी २००८. |
| ३. | __________ पदाची वेतन संरचना | पे बँड १, रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| ४. | नियुक्तीच्या दिनांकास (०२.०१.२००८ रोजी) वेतननिश्चिती रु. ५०४६ x १.८६ = ९३८५ म्हणजेच दहाच्या पटीत ९३९०/- (शासन निर्णय दि. ११.०७.२०१२ च्या परिच्छेद क्र. २ अ मधील तरतुदीनुसार) | **रु. ९३९०** |
| ५. | पदास लागू असलेले ग्रेड वेतन | **रु. १९००** |
| ६. | पुढील वेतनवाढीचा दिनांक | ०१.०७.२००९ |

पुढील वेतन वाढीचा दिनांक सुधारित वेतन [म.ना.से (सु.वे.) नियम, २००९ मधील नियम ९ आणि १०] आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :-

| बाब क्र. | वेतनवाढीचा दिनांक | **वेतनवाढीनंतरचे वेतन Pay after Increment** | |
|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणीमधील वेतन | ग्रेड वेतन |
| i | ii | iii | iv |
| १. | **०१ जुलै २००९** | **९३९०+ ३४० = ९७३०** [अ.क्र. ४ + अ.क्र. ५ च्या ३%] | **१९००/-** [वरील अ.क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे] |
| २. | **०१ जुलै २०१०** | **९७३०+ ३५० = १००८०** [बाब क्र. १ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. १ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१९००/-** |
| ३. | **०१ जुलै २०११** | **१००८० + ३६० = १०४४०** [बाब क्र. २ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. २ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१९००/-** |
| ४. | **०१ जुलै २०१२** | **१०४४० + ३७० = १०८१०** [बाब क्र. ३ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. २ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१९००/-** |

## उदाहरण ५

## कनिष्ठ राजादिष्ठ अधिकारी

(०१.०१.२००६ नंतर सैन्य सेवेतून निवृत्त झालेले व ०१.०१.२००६ नंतर नागरी सेवेत रुजू झालेले)

१. सैन्य सेवा निवृत्ती दिनांक : **०१ सप्टेंबर २००८**

२. सैन्य सेवेतील अंतीम वेतन : (मूळ वेतन रु. ८४६०+ग्रेड पे रु. २४००+क्लास पे रु २००= रु. ११०६०/-)

३. नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना : **पे बँड -१S, रु. ४४४०-७४४०, ग्रेड पे १३००**

४. नियुक्ती दिनांक : ०६.०४.२००९

| अ.क्र | बाब | वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सैन्यातील अंतिम वेतन<br>(मूळ वेतन रु. ८४६०+ग्रेड पे रु. २४००+क्लास पे रु २००= रु. ११०६०/-) | ११०६० |
| २. | नागरी सेवेत नियुक्तीचा दिनांक | ०६.०४.२००९ |
| ३. | _____ पदाची वेतन संरचना **- पे बँड -१S, रु. ४४४०-७४४०, ग्रेड पे १३००** | |
| ४. | नियुक्तीच्या दिनांकास (०६.०४.२००९ रोजी) वेतननिश्चिती<br>रु. ११०६०-१३०० (नागरी सेवेतील ग्रेड वेतन) =९७६०/-<br>वेतनबँड मधील कमाल वेतन रु. ७४४०, म्हणून रु. ७४४० इतके मूळ वेतन निश्चित करण्यात येत आहे. (शासन निर्णय दि. ११.०७.२०१२ च्या परिच्छेद क्र. ३ (१) मधील तरतुदीनुसार) | **रु. ७४४०** |
| ५. | **वैयक्तिक वेतन** रु. ९७६० - रु. ७४४० = रु. २३२०<br>(सैन्य सेवेतील अंतीम वेतन वजा निश्चित केलेले वेतन यातील फरक) | **रु. २३२०** |
| ६. | पदास लागू असलेले ग्रेड वेतन | **रु. १३००** |
| ७. | पुढील वेतनवाढीचा दिनांक | **०१.०७.२०१०** |
| | श्री. ______________, ______यांचे वेतन बँडमधील वेतन, वेतनबँडच्या कमाल टप्प्याच्या पुढील रक्कमेवर निश्चित होत असल्याने शासन अधिसूचना २२.०४.२००९ मधील नियम १० व शासन परिपत्रक क्र. वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि. ०५.०५.२०१० मधील परिच्छेद क्र. २.६ नुसार **एक वर्षानंतर** लगतचा उच्च वेतनबँड पीबी-१, रु. ५२००-२०२०० मंजूर करण्यात येत आहे. सदर वेतनबँड मंजूर करताना एक वेतनवाढ देण्यात येत आहे. | |

२. पुढील वेतन वाढीचा दिनांक सुधारित वेतन [म.ना.से (सु.वे.) नियम, २००९ मधील नियम ९ आणि १०] आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :-

| बाब क्र. | वेतनवाढीचा दिनांक | **वेतनवाढीनंतरचे वेतन Pay after Increment** | | |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणीमधील वेतन | ग्रेड वेतन | वैयक्तिक वेतन |
| i | ii | iii | iv | v |
| १. | **०१ जुलै २०१०**<br>(नियमित वेतनवाढ) | **७४४०+ २७० = ७७१०**<br>[अ.क्र. ४ + अ.क्र. ६ च्या ३%] | **१३००/-**<br>[वरील अ.क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे] | **२०५०** |
| २. | **०१ जुलै २०१०**<br>(उच्च वेतनबँड लागू केल्याच्या अनुषंगाने अतिरिक्त वेतनवाढ) | **७७१०+ २७० = ७९८०**<br>[बाब क्र. १ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. १ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | **१७८०** |
| ३. | **०१ जुलै २०११** | **७९८० + २८० = ८२६०**<br>[बाब क्र. २ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. २ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | **१५००** |
| ४. | **०१ जुलै २०१२** | **८२६० + २९०= ८५५०**<br>[बाब क्र. ३ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. ३ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | **१२१०** |

## उदाहरण ६

**कनिष्ठ राजादिष्ठ अधिकारी**

(०१.०१.२००६ पूर्वी सैन्य सेवेतून निवृत्त झालेले व ०१.०१.२००६ नंतर नागरी सेवेत रुजू झालेले)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सैन्य सेवा निवृत्ती दिनांक | : | **०१ ऑगस्ट २००१** |
| २. | सैन्य सेवेतील अंतीम वेतन | : | (मूळ वेतन रु. ४२००+क्लास पे रु १००+ जीएस पे रु ६४ = रु ४३६४/-) |
| ३. | नागरी सेवेतील पदाची वेतन संरचना | : | **पे बँड -१एस (रु. ४४००-७४४०), ग्रेड पे १३००/-** |
| ४. | नियुक्ती दिनांक | : | **०२.०५.२००९** |

| अ.क्र | बाब | वेतन रुपये |
|---|---|---|
| १. | पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे सैन्यातील अंतिम वेतन<br>(मूळ वेतन रु. ४२००+क्लास पे रु १००+ जीएस पे रु ६४ = रु ४३६४/-) | ४३६४ |
| २. | नागरी सेवेत नियुक्तीचा दिनांक | ०२ मे २००९ |
| ३. | ______ पदाची वेतन संरचना - **पे बँड १-एस (रु. ४४००-७४४०), ग्रेड पे १३००/-** | |
| ४. | नियुक्तीच्या दिनांकास (**०२.०५.२००९** रोजी) वेतननिश्चिती<br>रु. ४३६४X१.८६ = ८११७.०४ म्हणजेच दहाच्या पटीत ८१२०/-<br>(वेतनबँड मधील कमाल वेतन रु. ७४४०, म्हणून रु. ७४४० इतके मूळ वेतन निश्चित करण्यात येत आहे.)<br>(शासन निर्णय दि. ११.०७.२०१२ च्या परिच्छेद क्र. २ अ मधील तरतुदीनुसार) | **रु. ७४४०** |
| ५ | **वैयक्तिक वेतन** (रु. ८१२० - रु. ७४४०) = रु. ६८०<br>(सैन्य सेवेतील अंतीम वेतन वजा निश्चित केलेले वेतन यातील फरक) | **रु. ६८०** |
| ६. | पदास लागू असलेले ग्रेड वेतन | **रु. १३००** |
| ७. | पुढील वेतनवाढीचा दिनांक | ०१.०७.२०१० |

श्री. _______ यांचे वेतन बँडमधील वेतन, वेतनबँडच्या कमाल टप्प्याच्या पुढील रक्कमेवर निश्चित होत असल्याने महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्र. वेपुर १२०९/प्र.क्र.६९/सेवा-९ दि. ०५.०५.२०१० मधील परिच्छेद क्र. २.६ नुसार एक वर्षानंतर लगतचा उच्च वेतनबँड ***पीबी-१, रु. ५२००-२०२००*** मंजूर करण्यात येत आहे. सदर वेतनबँड मंजूर करताना एक वेतनवाढ देण्यात येत आहे.

पुढील वेतन वाढीचा दिनांक सुधारित वेतन [म.ना.से (सु.वे.) नियम, २००९ मधील नियम ९ आणि १०] आणि वेतनवाढीनंतरचे वेतन :-

| बाब क्र. | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढीनंतरचे वेतन Pay after Increment | | |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड/वेतनश्रेणीमधील वेतन | ग्रेड वेतन | वैयक्तिक वेतन |
| i | ii | iii | iv | v |
| १. | **०१ जुलै २०१०**<br>(उच्च वेतनबँड लागू केल्याच्या अनुषंगाने अतिरिक्त वेतनवाढ) | **७४४०+ २७० = ७७१०**<br>[अ.क्र. ४ + अ.क्र. ६ च्या ३%] | **१३००/-**<br>[वरील अ.क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे] | **४१०** |
| २. | **०१ जुलै २०१०**<br>(नियमित वेतनवाढ) | **७७१०+ २७० = ७९८०**<br>[बाब क्र. १ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. १ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | **१४०** |
| ३. | **०१ जुलै २०११** | **७९८० + २८० = ८२६०**<br>[बाब क्र. २ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. २ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | - |
| ४. | **०१ जुलै २०१२** | **८२६० + २९०= ८५५०**<br>[बाब क्र. ३ मधील स्तंभ क्र. iii + बाब क्र. ३ मधील स्तंभ क्र iii व iv यांच्या बेरजेच्या ३%] | **१३००/-** | - |